# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/-३३५ /२०२३-२४

दिनांक : ०३/०७/२०२३

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) स्वयम II को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.०६/०२/२०२३ रोजीचे पत्र. .** | | | | | |
| १ | पिंपळ | १५ ते २० फुट | ०२ | ०८ वर्ष | सदरची झाडे स्वयम II को.ऑ.हौ.सो.लि..टाइप क्यू-३. पुनम गार्डन,युनिक ऑरम समोर,मिरा रोड (पु) येथिल सोसायटीच्या आवारात असून झाडांची मुळे चेंबर मध्ये गेली आहेत तसेच सोसायटीच्या उद्यानाच्या कंपाऊड वॉल (संरक्षण भिंती मध्ये) असल्याने झाडे पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कारणास्तव सदरची झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| **२) गीता संजय ठाकरे यांचे दि.२४/०५/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | वड | ३० ते ४० फुट | ०१ | १८ वर्ष | सदरचे झाड सिताबाई चाळ,स्वामी दुकाना जवळ.मिरागावठण महाजनवाडी,मिरा रोड (पु) येथिल असून घराच्या भिंतीत घुसले आहे भिंत पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| **३) अजय माटे (डाचकुल पाडा) यांचे दि.१९/०६/२०२३ रोजीचे पत्र.व नामदेव रतन गावित यांचे दि.२३/०६/२०२३ रोजीचे पत्र.** | | | | | |
| १ | चिंच | १० ते १५ फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड डाचकुल पाडा गावित निवास, माशाचा पाडा.काशिगाव येथिल असून झाड झुकलेले आहे.झाडाच्या फांद्या घरावर पडत आहे.जोराच्या वाऱ्याने झाड पडुन जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(योगेश गुणिजन)
सहाय्यक आयुक्त
तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका